# जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

दुरध्वनी क्र.02452-222644 - फॅक्स क्र.02452-223774 - ई-मेल - dpo.pbn@gmail.com


जिल्हा वार्षिक योजना 2018-19 (सर्वसाधारण)
अंतर्गत निधी वितरण

जा.क्र.जिनिस/जिवायो-18-19/नि.वि./ 1562 दि. 9 ऑगस्ट, 2018

संदर्भ - 1. महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाचे आदेश क्र. जिवायो- 1007/प्र.क्र.39/का-1444, दि.16/02/2008

2. संचालक, आत्मा, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, यांचे निधी वितरण आदेश क्र.कृआ/आत्मा/प्र.क्र.03/नि.वि./791/2018, दि.10.08.2018

3. प्रकल्प संचालक, आत्मा, परभणी यांचे निधी मागणी पत्र क्र.आत्मा/नि.नो.स./384/2018, दि.24.08.2018

## निधी वितरण आदेश

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2018-19 या वित्तिय वर्षामध्ये राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तारविषयक सुधारणा करण्यासाठी सहाय्य (राज्य हिस्सा) या केंद्र पुरस्कृत योजनेसाठी रु.45.42 लक्षची मंजूर व अर्थसंकल्पीत अर्थसंकल्पीत झालेली आहे.

प्रकल्प संचालक, आत्मा यांनी संदर्भ क्र.3 अन्वये या केंद्र पुरस्कृत योजनेसाठी रु.55.37 लक्ष निधी प्राप्त झाल्याचे कळविले असुन राज्य हिश्याच्या निधीची मागणी केलेली आहे. त्यास अधिन राहुन व संदर्भिय शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी जिल्हाधिकारी, परभणी या आदेशान्वये खालील तपशिलाप्रमाणे केंद्र हिश्याच्या (60:40) प्रमाणानूसार राज्य हिस्सा **रु.36.91 लक्ष (अक्षरी रुपये छत्तीस लक्ष एक्क्यान्नव हजार फक्त)** निधी वितरीत करीत आहे.

सदर निधी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, परभणी यांचेकडे वर्ग करण्यात येत आहे.

(रु. लाखात)

| अ.क्र. | योजनेचे नाव | मंजुर तरतूद | BDS वर उपलब्ध निधी | **या आदेशान्वये वितरित निधी** | लेखाशिर्ष नियोजन विभाग मागणी क्र.ओ- 50 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, परभणी यांचे अधिनस्त (प्रकल्प संचालक, आत्मा)** | | | | | |
| 1 | राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तारविषयक सुधारणा करण्यासाठी सहाय्य (राज्य हिस्सा) | 45.42 | 45.42 | **36.91** | 2401 पीक संवर्धन<br>(00) 109 विस्तार व प्रशिक्षण,<br>(49) जिल्हा योजना-परभणी<br>(49)(02) राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तारविषयक सुधारणा करण्यासाठी सहाय्य (के.पु.यो.) (2401 8487) 33-अर्थसहाय्य |
| **एकुण** | | **45.42** | **45.42** | **36.91** | |

**(अक्षरी रुपये छत्तीस लक्ष एक्क्यान्नव हजार फक्त)**

## निधी वितरण पुढील अटींच्या अधिन राहुन करण्यात येत आहे.

1. वितरित केलेल्या निधीच्या मर्यादेतच खर्च करावे. वितरित केलेल्या निधीपेक्षा जादा खर्च केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयन यंत्रणेची राहील.
2. **केंद्र पुरस्कृत योजनेसाठी वरील प्रमाणे वितरित करण्यात आलेल्या राज्य हिश्याच्या निधीस अनुसरुन केंद्र हिश्याचा निधी उपलब्ध करुन घेवून त्यानुसारच राज्य हिश्याचा निधी खर्च करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील या अटींवरच राज्य हिश्याचा निधी वितरित करण्यात येत आहे.**
3. सदर निधी खर्च करण्यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचना तसेच निकषांनुसारच खर्च करण्यात यावे.
4. या आदेशान्वये वितरित करण्यात आलेला निधी चालु आर्थिक वर्ष 2018-19 अखेरीस अखर्चित राहिल्यास किंवा व्यपगत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन अधिका-यांची राहील.

5. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी मंजुर करण्यात आलेला आहे त्या विनिर्दिष्ट प्रयोजनासाठीच खर्च करण्यात यावा, इतर कोणत्याही योजनांवर/कामावर खर्च करण्यात येवू नये.
6. या योजनेसाठी आवश्यक असलेली तांत्रिक मंजुरी व प्रशासकीय मान्यता सक्षम प्राधिका-यांकडुन घेतल्यानंतरच निधी खर्च करण्यात यावा. सदरील मंजुरी घेण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन अधिका-यांची राहील या अटीवरच निधी वितरित करण्यात येत आहे.
7. सदरील अर्थसहाय्याची उपयोगिता प्रमाणपत्रे व पुर्णत्वाचे दाखले महालेखापाल कार्यालयास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास दयावी. तसेच या योजनांवर झालेल्या खर्चाचे महालेखापाल यांचे कार्यालयात नोंद झालेल्या खर्चाशी ताळमेळ घालुन त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.
8. सदरील योजनेचा त्रयस्थ यंत्रणेकडुन मुल्यमापन करण्यात येवु शकते तेव्हा या योजनेतंर्गत होणा-या खर्चाचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा आणि दरमहा 5 तारखेपुर्वी या कार्यालयास प्रगती अहवाल सादर करावा.
9. आवश्यक असलेल्या कामाबाबत निविदा मागविणे, स्विकृत करणे तसेच खरेदीबाबतचे सर्व अधिकार प्रचलित पध्दतीनुसार राहतील.
10. योजनेच्या अंमलबजावणीवर, खर्च व तांत्रिक बाबींवर संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे नियंत्रण राहील.
11. या योजनेतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोकलेखा समिती, विधीमंडळ कामकाज इ. बाबीसाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचा मंत्रालयीन प्रशासकीय विभाग जबाबदार राहील.
12. या आदेशान्वये वितरित करण्यात आलेल्या निधीचा खर्च वरीलप्रमाणे योजनेच्या स्तंभ क्र.6 मध्ये दिलेल्या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा.

प्रति,

1. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, परभणी
2. प्रकल्प संचालक, आत्मा, परभणी

स्वा/-
जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

प्रति,

1. महालेखापाल नागपूर - 2
2. जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी